# महाराष्ट्र शासन

अधिष्ठाता यांचे कार्यालय

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु.), डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८

OFFICE OF THE DEAN,

R.A.PODAR MEDICAL COLLEGE, DR.ANNIE BESANT ROAD, WORLI, MUMBAI 400 018

Ph,No,022-24934214/Tel Fax :- 022-24936881 E-mail ID:- deanrapmc@gmail.com

जा.क्र.राआपो/आस्था/कंत्राटीमुलाखत/6530/अ/२०२६ दिनांक :- १५.०७.२०२६

## करार पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत.

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथील विविध विषयांच्या सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक या पदांवर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी विहित अटींची व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छूक उमेदवारांकडून परिशिष्ट "अ" च्या नमुन्यात अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता,रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई ४०००१८ येथे **खालील नमूद विषयांकरिता दिनांक ३०.०७.२०२६ रोजी मुलाखती (Walk-in-interview) घेण्यांत येणार आहेत.** तरी **उमेदवारांनी सकाळी ठिक १०.०० वाजता उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.** तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरावयाच्या पदांचा विषय व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय | सहयोगी प्राध्यापक<br>एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | सहाय्यक प्राध्यापक<br>एकुण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) |
|---|---|---|---|
| १. | शारिरक्रिया | ०१ | ०१ |
| २ | शालाक्यतंत्र | ...... | ०१ |
| ३ | कायाचिकित्सा | ...... | ०१ |

**टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/ पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी करार पध्दतीवरील संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.**

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल .<br>२) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयूर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>३) ज्या उमेदवारांचे मूळ शोध निबंध हे, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये पसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार उमेदवार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे.<br>५) एम.एस.सी.आय.टी.संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. |
| अनुभव | :- | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर ज्याला आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये एकूण ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संथेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून तीन वर्ष अध्यापनाचा अनुभव असला पाहीजे. |
| मानधन | :- | **प्रतिमाह रु.१,२०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यांत येईल.** |

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/ पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक /सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी करार **पध्दतीवरील संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.**

| | | |
|---|---|---|
| पदनाम | :- | सहाय्यक प्राध्यापक |
| वयोमर्यादा | :- | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | :- | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेली अर्हता अथवा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल .<br>२) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, म्हणजेच त्यानुसार उमेदवार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे.<br>५) एम.एस.सी.आय.टी.संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. |
| मानधन | :- | **प्रतिमाह रु.१,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यांत येईल.** |

| | | | |
|---|---|---|---|
| इतर अटी | | १ | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून किंवा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिन्यांच्या कालावधीनंतर किंवा वयाचे ६५ वर्ष यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | | २ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | | ३ | सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी/करार पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ४ | नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणेच उमेदवारास पदाची कर्तव्य आणि जबाबदा-या पार पाडाव्या लागतील व त्यांच्याप्रमाणेच कामाचे तास राहतील तसेच त्यां७ना प्राप्त होणार कागदपत्र/ माहिती, इतर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे उमेदवारास आवश्यक राहील. |
| | | ५ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त नियमानुसार फक्त ११ महिन्यांसाठी ०७ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | | ६ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा राजिनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| | | ७ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्याकडून नियमितपणे घेण्यांत येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |
| | | ८ | कंत्राटी पध्दतीच्या उमेदवारास विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |
| | | ९ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | | १० | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपूष्टात येईल. |
| | | ११ | नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबधितास बंधनकारक राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १२ | **अ) कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना(अध्यापकांची) नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी/ सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात/ग्राहय धरला जाणार नाही अशा आशयाचे बंधपत्र नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर लगेच सादर करणे आवश्यक राहील.**<br>**ब) शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे संबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील**<br>**क) कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणा-या उमेदवारांची (अध्यापकांची) नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.** |
| | | १३ | भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे ऑन लाईन अध्यापक विनियोजन पध्दतीच्या (OTM) पोर्टल वरुन डि-लिंक करवून घेणे तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायीक अधिनियम, १९६१ चे अंतर्गत (MCIM) पंजीयन आवश्यक राहील. |
| | | १४ | कंत्राटी पध्दतीवरील उमेदवारास कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. |
| | | १५ | **नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रदद करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत.** |
| | | १६ | उमेदवार **अन्य संस्थेत कार्यरत असल्यास** संबधित संस्थेचे **ना-हरकत प्रमाणपत्र** तसेच उमेदवारांची **निवड झाल्यास रुजु होते वेळी संबधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक** राहील. |
| | | १७ | उमेदवाराने वयाची ६५ वर्ष पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात/समाप्त करण्यात येईल |
| | | १८ | सदर पदाचे मानधन हे प्राप्त अनुदानातून अदा करण्यांत येत असल्याने अनुदान उपलब्ध होईपर्यंत विलंब होऊ शकतो, त्यासाठी उमेदवारास कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| | | १९ | **कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यांत येणार नाहीत.** |
| | | २० | उमेदवारांनी मुलाखतीस येताना आवश्यक त्या सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती, तसेच अनुभव प्रमाणपत्र, मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत आणने अनिवार्य राहील. |
| | | २१ | प्राध्यापक व सहयोगी प्राध्याकांसाठी अत्त्युच्च शेक्षणिक अर्हता व अनुभवाचे चाळणी निकष लावण्यांत येतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २२ | भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार अध्यापकांसाठी Teacher Code असणे आवश्यक आहे. Teacher Code असणा-या अध्यापकांना प्राधान्य देण्यांत येईल. |
| | | २३ | National Teacher Eligibility Test उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईलृ. |

इच्छुक उमेदवारांनी www.mahayush.gov.in तसेच www.ayurvedinstitute.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता,रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई-१८ येथे उपरोक्त नमूद विषयांकरिता **दिनांक ३०.०७.२०२६ रोजी मुलाखती (Walk-in-interview) घेण्यांत येणार आहेत. तरी उमेदवारांनी सकाळी ठिक १०.०० वाजता उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.**

**प्रथमतः** उमेदवाराच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यांत येईल. तपासणीअंती उमेदवार पात्र ठरल्यासच मुलाखत घेतली जाईल. अर्ज केलेला उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची जबाबदारी त्या-त्या उमेदवाराची राहील. यास्तव फक्त पात्र उमेदवारांनीच अर्ज करण्यांची दक्षता घ्यावी.

(डॉ.संपदा सं.संत)
अधिष्ठाता,
रा.आ.पोदा र वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई

## ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वैद्य/वैद्या.............................. या महाविद्यालयात दिनांक ................ पासून ................या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या............ ................यांची रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथे प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक या पदावर करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

संस्थाप्रमुख

..........................

प्राचार्य

..........................

ठिकाण :

दिनांक :

ठिकाण :

दिनांक :

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी. |
|---|

# अर्जाचा नमुना

## महाराष्ट्र शासन

## रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई - ४०० ०१८

प्रति,
मा.अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालया,
वरळी, मुंबई.

विषय :- आपल्या महाविद्यालयातील ............... या पदावर करार पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत.
संदर्भ :- आपली जाहिरात दिनांक ...............

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या माहविद्यालयातील प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक ............ (विषय) या पदावर करार पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीकरीता नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नांव | : | | | |
| | | | आडनाव | स्वतःचे नांव | वडिलांचे/पतीचे नांव |
| २) | नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW CCIM TEACHER CODE) | : | | | |
| ३) | पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह | : | | | |
| ४) | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | |
| ५) | ई - मेल | : | | | |
| ६) | जन्मदिनांक | : | | | |
| ७) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय | : | वर्ष | महिने | दिवस |
| ८) | राष्ट्रीयत्व | : | | | |
| ९) | **शैक्षणिक अर्हता :** माध्यामिक/ उच्च माध्यमिक परिक्षा/ पदवी/ पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्राबाबत नमूद करावे तसेच शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला व सर्व वर्षाच्या साक्षांकित मार्कशिट/प्रमाणपत्र सोबत जोडाव्यात. | | | | |

| | अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |

१०) अवगत असणाऱ्या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल.)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी (दि...ते दि...) | विद्यापीठाचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१२) प्रकाशित लेखांचा तपशील (लेखांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

१३) प्रकाशित पुस्तकांचा तपशील :

१४) पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

१५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६ | |
| ७. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |
| ११. | |

| | | |
|---|---|---|
| | १२. | |
| | १३. | |
| | १४. | |
| | १५. | |
| | १६. | |
| | १७. | |
| | १८. | |
| | १९. | |
| | २०. | |
| | २१. | |
| | २२. | |
| | २३. | |
| | २४. | |
| | २५. | |
| | २६. | |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी.............................................. प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहीती पूर्णतः खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

## DUTIES & RESPONSIBILITIES (AS PER MAHARASHTRA GOVT.RULES )

**ASSOCIATE PROFESSOR :**

1) The Associate Professor will have to teach the subject to the student in the college as per the instruction of the Professor of his/her subject in the college.
2) In case of Clinical subjects, he/she will have to impart clinical instruction in his/her subject to the students in the college as per the instruction of the Professor of his/her subject in the college.
3) He/she will have to assist the professor of his subject in the development of his/her department and maintain it up to date.
4) He will have to assist the professor of his/her subject in carrying out research in the concerned subject.
5) He/She will have to carry out any other duties as may be assigned to him/her by his/her Superiors.

**ASSISTANT PROFESSOR :**

1) To assisy the Professor/Associate Professor in Theory, Practical and clinical teaching of the subject to the undergraduates.
2) To assist the Professor in ward works in case of clinical subjects.
3) To perform duties in the O.P.D.in case of clinical subjects.
4) To attend patients in emergency situation whenever required.
5) To assist in P.G. teaching courses.
6) To relieve the residents as and when required.
7) To help the Professor in research work.
8) To perform such other duties in the Hospital and O.P.D. as assigned by the Professor or the Dean.

**Sd/-**
**Dean,**
**R.A.Podar Medical College,Worli, Mumbai**

# शपथपत्र

मी श्री/श्रीमती.........................................................................प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, जाहिरातीत नमूद अटी व शर्तीचे पालन करुन, कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही. तसेच शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/ आदेशाचे पालन करीन.

महत्वाची सुचना :- १) उमेदवारानी मुलाखतीस येतांना सर्व संबधीत मुळ कागदपत्रे व त्याच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणने अनिवार्य राहील. उमेद्वारांना सुचित करण्यात येते कि, सविस्तर माहीतीच्या आवेदनपत्राचा नमुना, अर्हता, अटी ई.बाबतचा सविस्तर तपशिल www.mahayush.gov.in व www.ayurvedinstitute.com या वेबसाईटवरुन प्राप्त करवून घ्यावा.

(डॉ.संपदा सं.संत)
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई.